नि.दि.दा.क्र. ५५/२०२१
सुनिता वि. महादेव
**CNR No. MHWS080007082021**

## <u>नि.क्र. २१ वरील आदेश</u>

प्रतिवादी क्र. ०२ ने दाखल केलेल्या प्रतिदाव्यास व मनाई हुकूम च्या अर्जास लेखी जवाब देण्याची परवानगी मिळणेसाठी मुळ प्रतिवादी क्र. ०१ म्हणजेच प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०१ यांनी सदर अर्ज केलेला आहे. त्यांचे थोडक्यात कथन असे की, प्रतिवादी क्र. ०२ ने न्यायालयामध्ये प्रतिदावा व मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे व त्याच्या प्रती मागच्याच तारखेला घेतल्या आहेत. त्या आधी लॉकडाऊनमुळे लेखी जवाब दाखल करु शकले नाही. त्यामुळे लेखी जबाब दाखल करण्यासाठी वेळ झाला. तो माफ होऊन लेखी जबाब व से दाखल करण्याची परवानगी मिळावी याकरिता हा अर्ज दाखल केला आहे.

<u>**०२**</u> याउलट प्रतिवादीच्या ०२ च्या वकीलांनी सदर अर्जास विरोध्द दर्शवुन सदर अर्ज नियमात व मुदतीत नसल्याने खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

<u>**०३**</u> दोन्ही पक्षाचे कथन ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मुळ वादीने सदर दावा वाटणी होऊन ताबा मिळणेसाठी, जाहीरनाम्यासाठी, व कायम हुकूमसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ०२ ने वकीलामार्फत हजर होऊन नि.क्र. १४ खाली जवाब दावा दाखल करुन नि.क्र. १५ खाली कायम मनाई हुकूम मिळणेसाठी प्रतिदावा दाखल केला आहे. त्याला प्रतिउत्तर म्हणून जवाबदावा दाखल करण्याची परवानगी सदर अर्जानुसार मुळ वादींनी मागितली आहे. नि.क्र. १५ वरील प्रतिदावा हा दिनांक १६.०६.२०२१ रोजी मुळ प्रतिवादी क्र. ०२ यांनी दाखल केलेला आहे. तर मुळ प्रतिवादी क्र. ०१ ने सदरचा अर्ज दिनांक २७.११.२०२१ रोजी दाखल केलेला आहे.

<u>**०४**</u> त्यामुळे जवाब दावा दाखल करण्याची संधी देऊनही त्यांनी विहीत कालावधीत जवाब दावा दाखल केलेला नसला आणि जवाब दावा दाखल करण्याचा ९० दिवसांचा कालावधी अगोदरच निघुन गेलेला असला तरी प्रतिदाव्याच्या प्रति अर्ज दाखल करण्याच्या अगोदरच्या तारखेला मिळाल्याचे मुळ प्रतिवादी क्र. ०१ च्या वकीलांचे कथन आहे. त्यामुळे जरी जवाब दावा दाखल करण्याचा ९० दिवसांचा कालावधी अगोदरच संपला असला तरी कोविड–१९ ची परिस्थिती आणि त्याअनुषंगाने वेळावेळी जारी

करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्व बघता नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. वादीला (मुळ प्रतिवादी क्र. ०२ ला) झालेल्या त्रासाकरीता सदर अर्ज खर्चासह मंजुर होणे योग्य ठरेल म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. मुळ प्रतिवादी क्र. ०१ म्हणजेच प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०१ चा अर्ज ५०/– रुपये खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. मुळ प्रतिवादी क्र. ०१ म्हणजेच प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र. ०१ यांनी अर्जाचा खर्च प्रतिदाव्यातील वादीला अदा केल्यानंतर त्यांचा जवाब दावा अभिलेखावर घेण्यात येईल.

Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2022.03.02 19:23:43 +0530

(योगेश द. कोईनकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड.

दि. ०२.०३.२०२२

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 02.03.2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 02.03.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 02.03.2022 |